# काव्यकुंज

## महिला सम्मेलन

पाहूनी शहरातील महिला सम्मेलनाचे पेव
खेड्यातील महिलांना आला चेव
त्या म्हणे आपणहि घेवू महिला सम्मेलन
पुरुषांविरुध्द करु आंदोलन
महिलांनी घेतली मग सभा
अध्यक्ष कोणाला करावा हा प्रश्न राहिला उभा
सभेत त्यांनी घेतला हा ठराव
गावातल्या पाटलाला अध्यक्ष कराव
पाटलाला त्यांनी दिले सम्मेलनाचे आवतन
पाहुनी ते पाटलाला चढले स्फुरण
मग काय पाहता पाटलाचे पळाले भान
तो गावभर फिरत होता देत मिशीवर ताव
सम्मेलनात महिलांनी पुरूषांची केली ऐसी की तैसी
पाहूनी ते पाटलाची खाली झाली मिशी
एक म्हणे काही कमी नाही माहा बुवा
रोज पिते दारू आणि रोज खेळते जुवा
सम्मेलनात चालला होता बायांचा गलका
नवल म्हणजे शांत बसल्या होत्या काही बायका
तुम्हाला नाही का कोणती अडचण
का बरे आम्हाला येत नाही रागवण
अहो आमचे नवरे नाही पीत दारू नाही खेळत जुवा
तंबाखु सोडा, साधा खात नाही ओवा
म्हणून आम्ही त्यांचे आहोत समर्थक
त्यांच्यामुळे आमच्या जीवनाचे झाले सार्थक
गावकऱ्यांनी केले पाटलाला दवाखान्यात भरती
पाटलाचं डोके खाली अन दोन्हीही पाय होते वरती
भेटायला गेल्या पाटलाला सर्व बाया
त्याहिले पाहून पाटलाची थरारली काया
पाटील म्हणे शपथ घेवून सांगतो सर्वा समक्ष
हयापुढे जिंदगीत होणार नाही महिला सम्मेलनांचा अध्यक्ष

**विजय घोरमारे,** टंकलेखक,
कार्यकारी संचालक (प्रकल्प-२)
यांचे कार्यालय, कोराडी



## आधार

आधार आहे जीवसृष्टीत,
सोबत जगत असलेल्या एकमेकांचा,
म्हणून जीवसृष्टी टिकून आहे....
आधार आहे प्रेमीयुगूलांना,
एकमेकांच्या आणाभाकांचा,
म्हणून एकमेकांच्या मिठीमध्ये,
प्रेमयुगूल टिकून आहे....
आधार आहे घरात,
सोबत राहात असणा-या माणसांना,
एकमेकांच्या सुखदु:खात सहभागाचा,
म्हणून कुटुंब टिकून आहे....
आधार आहे माणसाला,
त्याच्या भावी आयुष्याचा,
म्हणून मनुष्य जीवनात,
उपद्व्याप टिकून आहे....
आधार आहे शुरविरांना,
त्यांच्या शौर्याचा,
पळवून लावी समोरील शत्रुला,
म्हणून शूरवीर भूमी टिकून आहे....
आधार आहे व्यावसायिकांना,
हस्तकौशल्यामुळे व्यवसायात,
यश संपादनाचा,
म्हणून व्यवसाय टिकून आहे....

**विलास ज्ञानदेव बोरोले,**
टंकलेखक, भु.औ.वि.केंद्र